# शांतिदूत

## कॉलेज वार्तापत्र

Bharatiya Jain Sanghatana

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय

बकोरी फाटा, वाघोली, पुणे - ४१२ २०७

**वर्ष २०१३-१४, अंक १, २६ जानेवारी २०१४**

**संपादक : प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे**


### युवकांना योग्यवेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास सामाजिक जाणीव विकसित होते - मा. प्रदीप कंद



एन.एस.एस. शिबीराच्या समारोप प्रसंगी सत्कार करताना मा.प्रदिपदादा कंद

आपटी : कॉलेज जीवनात सांस्कृतिक कार्यक्रमा बरोबर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांमधून युवकांना आपल्या सुप्त गुणांचा अविष्कार करता येतो. यावेळी युवकांनी अनुभवातून स्वतःला घडविले पाहिजे. मित्रांबरोबर प्रत्येक उपक्रमात हिरीरीने सहभागी होताना आपल्या चुका शोधाव्यात. मित्रांच्या मदतीने आणि गुरुजणांच्या मार्गदर्शनाने या चुका सुधाराव्यात. यामधून कृतीमध्ये योग्य ते बदल करावेत असे मार्गदर्शन पुणे जिल्हा परिषद उपाध्यक्ष मा. प्रदीपदादा कंद यांनी आपटी, ता. शिरुर येथे केले. भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मा. शांतिलालजी बोरा हे कार्यक्रम अध्यक्ष, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे हे स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर जि. प. सदस्य मा. नंदकुमार पिंगळे, पं. स. समिती मा. भगवानराव शेळके यांच्यासह आपटी गावचे सरपंच मा. शिवाजी ढगे, उपसरपंच विक्रमतात्या गोसावी, ग्रामपंचायत सदस्य, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. बाळासाहेब चौधरी तसेच विद्यापीठ प्रतिनिधी कु. निखील आव्हाळे, रासेयो प्रतिनिधी कु. योगेश वाघमोडे, कु. आशा भोसले हे देखील उपस्थित होते. मा. प्रदीप कंद पुढे म्हणाले की, युवकांनी आव्हान स्विकारण्याची ताकद स्वतःमध्ये निर्माण करावी. कोणत्याही परिस्थितीवर केवळ टिका न करता विवेकाने विचार करून कृती करावी. जसे राजकारणावर टिकात्मक बोलण्याआधी मतदानाचा हक्क बजावणे, योग्य प्रतिनिधी निवडणे या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. ग्रामीण भागाचा शाश्वत विकास करताना शिक्षण आणि आरोग्य यावर भर द्यावा. याप्रसंगी मा. शांतिलालजी बोरा, पंचायत समिती सदस्य श्री. भगवानराव शेळके, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.



आपटी येथे श्रम संस्काराचे धडे घेताना एन.एस.एस. चे स्वयंसेवक



आपटी येथे रक्तदान करताना कार्यक्रम अधिकारी प्रा.महावीर श्रीश्रीमाळ

### बीजेएस कॉलेजमध्ये 'जैवविविधता दिन'



सापांबद्दल माहिती देताना सर्पमित्र श्री गंगाधर खेडकर

#### साजरा

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाघोली येथील कॉमर्स असोसिएशनच्या वतीने 'जैवविविधता दिन' सर्पमित्रांचे प्रात्यक्षिक दाखवून साजरा करण्यात आला. या प्रसंगी गंगाधर खेडकर यांनी भारतातील दुर्मिळ सापांच्या जाती नष्ट होत असल्याची खंत व्यक्त केली. सापांबद्दलचे गैरसमज दूर करुन साप वाचविले तर पर्यावरणाचे संतुलन राखले जाऊ शकते. हा विचार त्यांनी भाषांचे प्रात्यक्षिक दाखवून समजावून दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे उपस्थित होते. वाणिज्य मंडळाचे प्रमुख प्रा. बळवंत लांडगे, प्रा. राजाभाऊ जमदाडे, प्रा. ज्योती मगर, प्रा. किर्ती आव्हाळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गोते यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनी मानले.

### बीजेएस महाविद्यालयाच्या शांतिदीप नियतकालिकाचे प्रकाशन

वाघोली : भारतीय जैन संघटना महाविद्यालयाच्या १८ व्या वार्षिक शांतिदीप (२०१२-१३) अंकाचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष मा. शांतिलालजी मुथ्था यांच्या हस्ते दिनांक २९ सप्टेंबर २०१३ रोजी एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा व भूकंपग्रस्त माजी विद्यार्थी मेळावा या कार्यक्रमात करण्यात आले. या प्रसंगी माजी आमदार मा. चंद्रकांतजी छाजेड, संस्थेचे सचिव मा. प्रफुल्ल पारख, प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, मा. अभय मुनोत व इतर मान्यवर उपस्थित होते. या अंकाचे कार्यकारी संपादक प्रा. मनिषा बोरा आहेत. या अंकाचे संपादक मंडळ सदस्य डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, प्रा. जगदीश आवटे, प्रा. साक्षी व्यवहारे व विद्यापीठ प्रतिनिधी कु. मेघा मोरे होते.या प्रसंगी संपादक मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे व इतर सदस्यांचा सत्कार करण्यात आला. हा अंक महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर (www.bjscollege.org.in) उपलब्ध आहे.


संपादक – प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे
कार्यकारी संपादक – प्रा. सहदेव चव्हाण
सदस्य – डॉ.भूषण फडतरे, प्रा.गणेश जाधव, प्रा.शिवाजी सोनवणे

शांतिदूत संपादक मंडळ


### इंग्रजी बोलता येणे व संगणक येणे ही यशाची गुरुकिल्ली



मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे अभिभाषण करताना

**मा. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे**

वाघोली : भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयामध्ये सोमवार दिनांक २२ जुलै २०१३ रोजी गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मा. प्राचार्यांचे अभिभाषण प्रथम वर्षातील कला, विज्ञान व वाणिज्य आणि बीसीए शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी संस्थेची माहिती, ध्येय, उद्दिष्ट्ये, कॉलेजची शीस्त, कॉलेजमध्ये कार्यरत असणाऱ्या समित्या इ. विषयांची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी सध्याच्या आधुनिक युगात संगणकाची ओळख चांगल्या प्रकारे करुन घेणे त्याचबरोबर इंग्रजीला न घाबरता ती भाषा आत्मसात करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपाली गुलालकरी यांनी केले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येकाची ओळख नवीन विद्यार्थ्यांना करुन देण्यात आली. प्राचार्यांचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सहदेव चव्हाण यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनी केले तर सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन कांबळे यांनी केले.

### रक्षाबंधनातून प्रेमाचे नाते जीवनभर जपावे

**प्राचार्या डॉ. शोभा इंगवले**



वसतिगृहातील अनाथ विद्यार्थ्यांना राखी बांधताना मा.शोभा इंगवले

वाघोली : दि. २० ऑगस्ट २०१३ - रक्षाबंधनातून समाजात भ्रातृभाव, मातृभाव, पितृभाव याची जोपासना करण्याचा संदेश मिळतो. बहिण-भावाच्या प्रेमाचे हे प्रतिकात्मक नाते संस्कृती, संरक्षण, संक्रमण व संवर्धनातून जपले पाहिजे असे मत शाहू मंदिर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शोभा इंगवले यांनी भारतीय जैन संघटनेच्या वसतिगृहातील आदिवासी, अनाथ विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या रक्षाबंधनाच्या कार्यक्रमात व्यक्त केले.

महाविद्यालयातील मुलींनी वसतिगृहातील ३४५ अनाथ, आदिवासी मुलांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने हा सण साजरा केला. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी संस्कृतीत मोठी ताकद असते. वेगवेगळ्या जातिधर्मांना एकत्र आणण्याचा, संस्कृतीचा एक ठेवा म्हणून रक्षाबंधन या सणाकडे बघितले पाहिजे. संस्कृतीमधूनच मानवी जीवन सुसंस्कृत व मंगलमय करता येते. मा. शांतिलालजी बोरा यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी आई प्रतिष्ठानच्या सौ. कमलजी कांकरिया, जितेंद्रजी शेठिया यांच्यासह कर्नल एस. एस. बर्डे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी केले. पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा यांनी करुन दिला. प्रा. सचिन कांबळे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रा. पल्लवी दरेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## बीजेएस कॉलेजमध्ये विद्यार्थी शिक्षक दिन साजरा



शिक्षक दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मा.विश्वास देवकर

वाघोली : भारतीय जैन संघटना महाविद्यालयात शिक्षक दिन आणि महाविद्यालयाचा १९ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी कॉलेजचे संपूर्ण कामकाज पाहिले. वर्गातील तासिका, प्रशासन, नियोजन यामध्ये विद्यार्थी हिरीरिने सहभागी झाले. विद्यार्थी प्राचार्य म्हणून श्री. प्रकाश भोंडवे, उपप्राचार्य म्हणून कु. गौरी शिवले हिने तर कार्यालयीन अधिक्षक म्हणून कु. पुजा भंडारे यांनी काम पाहिले. यासह विद्यार्थ्यांनी कला, वाणिज्य, विज्ञान आणि बीसीएच्या तासिका घेतल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. विश्वास देवकर यांनी समाजाप्रती संवेदनशीलता, समस्याप्रती जाणीव, याकरिता शिक्षण संस्था, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी एकत्रीत काम करावे असे सांगितले. प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी विद्यार्थ्यांचे सुप्त गुण विकसित करण्याचे आवाहन केले. अध्यक्ष मा. शांतिलालजी बोरा यांनी बुद्धिमत्ता ही सर्वात मोठी श्रीमंती असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी, पाहुण्यांचा परिचय प्रा. पल्लवी दरेकर यांनी, आभार प्रदर्शन डॉ. सिद्धेश्वर गायकवाड यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन कांबळे यांनी केले.

## बीजेएस महाविद्यालयास जिल्हास्तरीय उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना एकक पुरस्कार


जिल्हास्तरीय उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना एकक पुरस्कार स्वीकारताना

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाघोली पुणे यांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पुणे विद्यापीठाचा पुणे ग्रामीण जिल्हास्तरीय उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना एकक पुरस्कार प्राप्त झाला. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी हा पुरस्कार स्विकारला. हा पुरस्कार पुणे विद्यापीठाचे बीसीयुडी संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड आणि सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विष्णू माने यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी रासेयो समन्वयक डॉ. शाकेरा इनामदार यांच्यासह विविध महाविद्यालयाचे प्राचार्य आणि विद्यार्थी उपस्थित होते. बीजेएस कॉलेजच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपाली गुलालकरी यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी हा पुरस्कार यावेळी पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाविद्यालयास मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शांतिलालजी मुथ्था, सचिव मा. प्रफुल्लजी परख, मा. अभयजी मुनोत, मा. शांतिलालजी बोरा व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## 'जागर जाणिवांचा अभियान' अंतर्गत विविध


जागर जाणिवांचा अभियान अंतर्गत रॅली

## कार्यक्रमांचे बीजेएस महाविद्यालयात आयोजन

वाघोली : भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात महाराष्ट्र शासन पुरस्कृत जागर जाणिवांचा अभियान दिनांक १३ डिसेंबर ते १८ डिसेंबर २०१३ दरम्यान विविध अभिनव उपक्रमांनी संपन्न झाले. वाणिज्य विभागातर्फे डॉ. सुशील शर्मा, यांचे Global Opportunities for women in Commerce and Management या विषयावरील व्याख्यान झाले. जागर जाणिवांचा अभियान अंतर्गत कन्या जन्मानंद लखोपती ठेव पावती वितरण समारंभ सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०१३ रोजी संपन्न झाला. या निमित्ताने दारिद्र्य रेषेखालील गरिब, होतकरु कुटुंबातील एका वर्षाच्या आतील सात कन्या अपत्यासाठी प्रत्येकी रुपये १५,०००/- २० वर्षांकरिता उच्च शिक्षणाची तरतूद म्हणून मुदतठेव पावती महाविद्यालयातर्फे प्रदान करण्यात आली. तसेच विद्यार्थीनींकरिता विद्यार्थीनी कल्याण मंच आयोजित एक दिवसीय व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डॉ. सुप्रिया कोठारी यांनी महिलांविषयक कायदे व समुपदेशन, मा. प्राचार्या डॉ. नयना निमकर यांचे व्यायाम व आहार, मा. अलका जोशी यांचे स्त्रीयांवरील अत्याचार व उपाय या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. तसेच हा दिवस

## शांतिलालजी मुथ्था यांच्या वाढदिवसानिमित्त ४२ जणांचे रक्तदान


रक्तदान शिबिर प्रसंगी महाविद्यालयाचे विद्यार्थी

वाघोली : दि. १३ ऑगस्ट २०१३ - भारतीय जैन संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष मा.शांतिलालजी मुथ्था यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जैन संघटनेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात ४२ जणांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांच्या हस्ते झाले. वाघोली प्रकल्पाचे प्रशासन अधिकारी मा. कर्नल एस. एस. बर्डे, प्राचार्य तानाजी वाडेकर, बीजेएस विद्यालय, उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, कार्यक्रम अधिकारी डॉ. रुपाली गुलालकरी, प्रा. सचिन कांबळे, प्रा. महावीर श्रीश्रीमाळ इ. उपस्थित होते.

रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रूपाली गुलालकरी, प्रा. सहदेव चव्हाण आणि प्रा. सचिन कांबळे यांनी केले. या शिबिरासाठी ससून प्रादेशिक रक्तपेढीचे सहकार्य लाभले.

## १७ वे स्त्री साहित्य विचारवेध संमेलन बीजेएस कॉलेज मध्ये संपन्न

वाघोली : प्रसिध्द साहित्यिक बाबा भारती यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, पुणे व भारतीय जैन संघटनेचे कला, वज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली यांच्या संयुक्त विद्यमाने सतरावे स्त्री साहित्य विचारवेध संमेलन दिनांक ११ ऑक्टोंबर २०१३ रोजी आयोजित करण्यात आले होते. जेष्ठ साहित्यिका डॉ. अश्विनी धोंगडे संमेलनाध्यक्षा होत्या. या संमेलनात 'काव्यपंढरी' कवीसंमेलनाचे आयोजन केले होते. त्याचबरोबर प्रबुध्द साहित्यिक बाबा भारती गुणवंत शिक्षक पुरस्काराचे वितरण मा. गोविंद घोळवे यांच्या हस्ते झाले.


संमेलनाच्या अध्यक्षा मा. डॉ. अश्विनी धोंगडे यांचा सत्कार मा. प्राचार्य

कॉलेज मधील डॉ. भूषण फडतरे आणि डॉ. संजय गायकवाड यांना पुरस्कार देण्यात आला.

## महिलांच्या श्रमाचा मानवतेतून विचार व्हावा


महिलांचे सबलीकरण विषयी मार्गदर्शन करताना मा. विद्या कुलकर्णी

### विद्या कुलकर्णी

वाघोली : आपल्या समाजात महिलांच्या कौटुंबिक आणि कुटुंबाबाहेरील श्रमांचा विचार झालेला नाही. स्त्री-पुरुष विषमतेमुळे महिलांचे अनेकांगी श्रम हे गृहित धरुन त्यांची दखल घेतली जात नाही. महिलांच्या अनेक पदरी समस्यांना सामोरे जाण्याठी हा श्रमांचा, योगदानाचा मानवतेच्या भूमिकेतून विचार करणे गरजेचे असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्या विद्या कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'बिनमोलाचे श्रम' या छायाचित्र प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. तसेच छायाचित्र प्रदर्शन पाहून विद्यार्थ्यांनी आपली मते नोंदवली. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना कुलकर्णी यांनी उत्तरे दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. किशोर देसर्डा यांनी प्रतिकूल परिस्थितीत यशाचे शिखर गाठणाऱ्या महिलांची उदाहरणे देऊन मानवतेच्या विकासासाठी संघर्ष अटळ असल्याचे मत नोंदवले. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. महावीर श्रीश्रीमाळ यांनी तर परिचय कु. सचिन खाडे, आभार प्रदर्शन कु. प्रतिक्षा वाळके तर सूत्रसंचालन कु. शारदा शिंदे हिने केले.

## बी. जे. एस. कॉलेजमधील रोजगार मेळाव्यात ३५२ उमेदवारांची उपस्थिती

वाघोली : जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र, पुणे व भारतीय जैन संघटना कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक १९.१०.१३ रोजी कॉलेज मधील विद्यार्थी,व वाघोली परिसरातील उमेदवारांसाठी महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. एकूण १४ कंपन्यांमधील १०७५ पदे उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आली होती. या मेळाव्याचे उद्घाटन श्री. शांतिलालजी बोरा यांनी केले तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे यांनी उमेदवारांना संधीचा फायदा घेणे आवश्यक आहे असे सांगितले. शासकीय व मेळाव्यासंबंधी योजनांची उमेदवारांना माहिती दिली. या रोजगार मेळाव्यात एकूण ३५२ उमेदवारांनी मुलाखती दिल्या व १८५ उमेदवारांची निवड झाली. एकूण १४ कंपन्याकडून मुलाखती घेण्यात आल्या.